शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद
पत्र प्राप्त 6/11/96
आवक क्र. 6748
विभाग मा.3

+२ स्तरावरील कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेली राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती....

शिष्यवृत्ती संचात व दरात सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्रमांक-एससीएच-१०९५/[८५/९५]/मारि-८
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १५ ऑक्टोबर, १९९६

वाचा:- १] शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्रमांक-एससीएच-१०६३/यु, दिनांक-४. ६. १९६४.
२] शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्रमांक-एससीएच-१०६६/यु, दिनांक-४. ७. १९६६.
३] शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग, क्रमांक-एससीएच-२२६८/८५४२४/एस, दिनांक-२९. ५. १९७१.
४] शासन निर्णय, शिक्षण विभाग, क्रमांक एससीएच-१०७३/एस, दिनांक-१६. ५. १९७४.
५] शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्रमांक: एससीएच-१०७५/१७५७९/२५, दि. ६. १. १९७७. [+२ स्तरावर १२०० शिष्यवृत्त्या.]
६] शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक एससीएच-१०९३/[३७९/९३]/मारि-८, दिनांक-२. ३. ९४ [अभ्यासगटाची नियुक्ती].
७] अभ्यास गटाच्या शिफारशी व शिफारशींना दि. २४. ७. ९५ ला प्राप्त झालेली शासन मान्यता. [नस्ती क्र. एससीएच-१०९५/[१७८/९५]-मारि-८

प्रस्तावना:- शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्रमांक: एससीएच-१०७५/ १७५७९/२५, दिनांक-६. १. ७७ अन्वये नवीन आकृतीबंधानुसार कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर दरमहा रु. २५ प्रमाणे शिष्यवृत्त्यांचे एकूण १,२०० संच मंजूर केले आहेत. ही शिष्यवृत्ती सन १९७६-७७ च्या शैक्षणिक वर्षापासून कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सुरु करण्यात आली. या सर्व शिष्यवृत्त्या माध्यमिक शालांत परिक्षेमध्ये कमीत कमी ६० टक्के गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. ही शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी पालकांच्या उत्पन्नाच्या मर्यादेची अट नाही. विद्यार्थ्यास +२ स्तरावर उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे, या मुख्य उद्देशाने ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

२. शासन स्तरावरील शिष्यवृत्त्यांच्या संचात व दरात सुधारणा या

...२

अशासकीय ठरावावर दिनांक १७.१२.९३ रोजी विधानपरिषदेत शासन स्तरावरुन दिल्या गेलेल्या आश्वासनानुसार दिनांक-२.५.९४ च्या शासन आदेशान्वये नियुक्त केलेल्या अभ्यासगटाने या शिष्यवृत्तीबाबत केलेल्या खालील शिफारशी शासनाने दिनांक-२४.७.९५ रोजी मान्य केल्या आहेत.

अ] सध्याचे संच ४ पट म्हणजेच ४८०० अदा करण्यात यावेत.

ब] शिष्यवृत्तीचे सध्याचे दर दुप्पट म्हणजे रु.५० दरमहा करण्यात यावेत.

३. प्रस्तावात अंतर्भूत झालेला आर्थिक भार विचारात घेता, शिष्यवृत्तीचे वाढीव दर १९९६-९७ पासून मान्य करुन, शिष्यवृत्तीच्या संचाची संख्या टप्प्याटप्प्याने, १९९६-९७, १९९७-९८ व १९९८-९९ या तीन वर्षात वाढवावी असे वित्त विभागाकडून सूचविण्यात आले. त्याप्रमाणे आर्थिक तरतूद करुन प्रशासकीय आदेश निर्गमित करण्याचा प्रश्न शासनाचे विचाराधीन होता.

शासन निर्णय :- १-२ स्तरावरील कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या खुल्या गुणवत्ता शिष्यवृत्ती [illegible] दिनांक [illegible] च्या शासन आदेशान्वये १९७६-७७ पासून द.म.२५ रु.प्रमाणे असलेले शिष्यवृत्त्यांचे १२०० संच १९९६-९७ पासून द.म.५० रु.प्रमाणे सुधारीत करण्यास तसेच संचाची संख्या टप्प्याटप्प्याने तीन वर्षात १९९६-९७ मध्ये २४०० संच, १९९७-९८ मध्ये ३६०० संच व १९९८-९९ मध्ये ४८०० संच अशी वाढविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १२०० शिष्यवृत्ती संचाची वाटणी सर्व जिल्ह्यांमध्ये १९९५-९६ पर्यंत जशी केलेली असेल त्याच्या दुप्पट संच प्रत्येक जिल्ह्यासाठी १९९६-९७ पासून विहित करुन २४०० संचाची वाटणी १९९६-९७ मध्ये करण्यात यावी.

३. या प्रित्यर्थ १९९७-९८ व १९९८-९९ मध्ये होणाऱ्या अतिरिक्त खर्चाची तंरतूद त्या त्या वर्षासाठी योग्यवेळी करण्यात यावी. तसेच ३६०० संच व ४८०० संच या संचाची जिल्हानिहाय विभागणी अनुक्रमे १९९७-९८ व १९९८-९९ साठी योग्यवेळी करण्यात यावी.

४. शिष्यवृत्ती दर वाढ व शिष्यवृत्ती संच वाढ यामुळे होणारा खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण-०२- माध्यमिक शिक्षण १०७ शिष्यवृत्त्या, १०७ [चार][ए][१] कनिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्त्या [२२०२ ०३७१] मागणी क्र.ई-२ योजनेतर" या अर्थशिर्षाखाली १९९६-९७ मध्ये केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

.....३

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या
[अन]ौपचारिक संदर्भ क्रमांक–११९५/९५/व्यय–५अ, दि. २६. १२. ९५ आणि क्रमांक–१६२/९६/
[व्य]य–५अ, दिनांक –५. २. ९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ भि. य. मंता ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी [माध्यमिक].
सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, मुंबई.
महालेखापाल–१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई.
महालेखापाल –१ [लेखा परीक्षा], मुंबई.
महालेखापाल– २[ लेखा व अनुज्ञेयता] नागपूर.
महालेखापाल–२ [लेखा परीक्षा], नागपूर.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्ह्यांचे जिल्हा कोषागार अधिकारी.
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
[वृत्तपत्रे, दूरदर्शन व आकाशवाणी या माध्यमाव्दारे प्रसिद्धीसाठी]
मा. शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री [शालेय शिक्षण], यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
वित्त विभाग [व्यय–५अ. ]
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
ग्राम विकास विभाग.
नस्ती क्र. एससीएच–१०९५/[१७८/९५]
निवड नस्ती [माशि–८]